पुण्यात जागतिक रेड क्रॉस दिन साजरा

पुणे (प्रतिनिधी) : दि. ८ मे २०१८ रोजी पुण्यातील इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे जागतिक रेड क्रॉस दिन तसेच आंतरराष्ट्रीय थालेसेमिया दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.३० वाजता झेंडा वंदनाने झाली. रेड क्रॉस ध्वजला स्वयंसेवक, नागरिक व पदाधिकाराऱ्यांनी मानवंदना दिली. या प्रसंगी रेड क्रॉस ध्येय गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाला सामान्य नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुणे रेड क्रॉस संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम पाठक, मानद सचिव प्रा. आर. व्ही. कुलकर्णी आणि रेड क्रॉसचे पदाधिकारी तसेच शाळा व महाविद्यालयाचे प्राचार्य व स्वयंसेवक या प्रसंगी उपस्थित होते. सुप्रसिद्ध सिनेकलाकार व मानसोपचारतज्ञ डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यानंतर झालेल्या कार्यक्रमात प्रा. आर. व्ही. कुलकर्णी यांनी रेड क्रॉसच्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आणि पुण्यातील रेड क्रॉसची माहिती सादर केली. आंबेगाव तालुक्यातील घोडेगावच्या बी. डी. काळे महाविद्यालयानी तसेच भावे प्राथमिक शाळानी रेड क्रॉस सामाजिक कार्यावर पथनाट्ये सादर केली. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. मोहन आगाशे यांनी मार्गदर्शन केले. पुण्यातील रेड क्रॉस गेली ९७ वर्षे उत्तम पध्दतीने काम करीत आहे. आपत्ती निवारणाचे तसेच जनतेचे आरोग्य सांभाळण्याचे काम करीत आहे. कर्ण बधिर मुलांची शाळा, थालेसेमिया केंद्र व इतर सुविधा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत. आधिका अधिक नागरिकांचा या कामात स्वयंसेवी सहभाग असावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. रेड क्रॉसच्या कामाला शुभेच्छा दिल्या.

यानंतर झालेल्या पारितोषिक वितरणात आंबेगाव तालुक्यातील घोडेगावच्या बी. डी. काळे महाविद्यालयास सर्वोत्तम स्वयंसेवी कामाचा नौशीर नानावटी फिरता करंडक प्रदान करण्यात आला. तसेच पुण्यातील रेणुका स्वरूप शाळेस शालेय स्तरावरील सर्वोत्तम कामाचा एन. के. महाजन फिरता करंडक प्रदान करण्यात आला. उत्तम काम करणाऱ्या महाविद्यालयाना तसेच शाळेच्या स्तरावरील रेड क्रॉस कामकरणाऱ्या प्राचार्याचा तसेच सहभागी विद्यार्थीचा गौरव करण्यात आला. थालेसेमियाग्रस्त बालकांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

पूजा गांडेकर एमपीएससी परीक्षेत मुलींमध्ये राज्यात आठवी

चाकण (प्रतिनिधी) : भोसे (ता. खेड) येथील शेतकरी कुटुंबातील कन्या पूजा जालिंदर गांडेकर हिने एमपीएससी परीक्षेत यश संपादन केले. विक्रीकर निरीक्षक पदापर्यंत मजल मारणाऱ्या या एका मराठी मुलीच्या अथक परिश्रम , जिद्द व चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भोसे (ता. खेड) येथील शेतकरी कुटुंबातील कु. पूजा जालिंदर गांडेकर हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विक्रीकर निरीक्षक (एसटीआय) परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करीत राज्यात मुलींमध्ये आठवा क्रमांक मिळवला. पुजाचे प्राथमिक शिक्षण भोसे गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले असून माध्यमिक शिक्षण चाकणच्या शिवाजी विद्यालयात झाले. महाविद्यालयीन शिक्षण खेडच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात घेवून आळंदीच्या एमआयटी कॉलेजमध्ये संगणक क्षेत्रातील शिक्षण घेतले आहे. पुजाचे वडिल जालिंदर गांडेकर हे सेंच्युरी कंपनीत नोकरीस असून शेती करतात. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पूजाने अपार मेहनत व उराशी जिद्द बाळगत रात्रंदिवस अभ्यास करून एमपीएससी परीक्षेत यश संपादन केले आणि भोसे गावचे व खेड तालुक्याचेही नाव उज्वल केले आहे. पूजाच्या उल्लेखनीय यशाबद्दल भोसे ग्रामस्थांच्या वतीने भोसे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन सर्जेराव लोणारी, तलाठी राजेंद्र वडणे, ग्रामसेवक गणेश ऐवळे, खेड तालुका राष्ट्रवादी युवकचे उपाध्यक्ष मुचकुंद जाधव यांच्या हस्ते पूजा जालिंदर गांडेकर हिचा शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक तानाजी कुटे, युवा उद्योजक सयाजी गांडेकर, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत लोणारी, कांताराम पऱ्हाड, संतसेवा प्रासादिक दिंडीचे सर्वेसर्वा ज्ञानेश्वर वाडेकर, भोसे पतसंस्थेचे उपाध्यक्ष अजित ओव्हाळ, जालिंदर गांडेकर, भिमसेन पवार, सुरेश कुटे, माऊली कुटे, संजय टकले, राजाराम कुटे, कुसुम कुटे, वसंत गांडेकर यांच्यासह बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

सध्या क्लास वन या पदावर काम करणारे नव्वद टक्के अधिकारी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत. त्यामुळे आपल्या मुलांच्या बौद्धिक पातळीनुसार त्यांना मराठी माध्यमातून शिक्षण दिले पाहिजे. मातृभाषेतून शिक्षण घेतले तर मुलांना लगेच आकलन होते. त्यांच्यातील प्रतिभा उंचावण्यास मदत होते. अलीकडे मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली पासून इंग्रजी विषय असतोच. आणि जास्त इंग्रजी विषयी कनवाळा असणारे पालक पाचवीपासून सेमी इंग्रजी माध्यम निवडू शकतात. यंदा स्टेट बोर्डचा बदललेला दहावीचा अभ्यासक्रम सीबीएसई माध्यमाच्या तोडीचाच आहे. दर्जेदार मराठी शाळा सुरू करण्यासाठी जनतेने शासनाकडे पाठपुरावा करणे गरजे आहे, असे मत मुचकुंद जाधव यांनी यावेळी व्यक्त केले.

स्वर्गीय लोकनेते प्रमोद महाजन पुण्यतिथीनिमित्त भाजपातर्फे अभिवादन

पिंपरी (प्रतिनिधी) : भारतीय जनता पार्टी कार्यालय खराळवाडी, पिंपरी येथे भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहरच्या वतीने स्वर्गीय लोकनेते प्रमोद महाजन यांच्या १२व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते लोकनेते प्रमोद महाजन यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व पुष्पहार अर्पन करून प्रमोद महाजन यांना पुण्यतिथीच्या निमित्ताने निमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार जगताप म्हणाले, दिवंगत लोकनेते प्रमोद महाजन हे सर्वसामान्य कार्यकर्त्याला पाठबळ देऊन पक्षाला तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम करणारे जनसेवक होते. राजनितीतज्ञ डावा हात वर करून भाषण करायची त्यांची लकब वेगळीच होती. नुसती विरोधकांवर टीका करणारी भाषणे न करता, विरोधकांच्या मर्मावर घाला घालणारी आणि लोकांना सोप्या भाषेत स्वतःचे म्हणणे पटवून देणारी भाषणे देणारा नेता म्हणजे प्रमोद महाजन हे आहे. मुरली मनोहर जोशी यांची एकता यात्रा त्याचे प्रमुख प्रमोद महाजन होते. अटल बिहारी वाजपेयी यांनी प्रमोद महाजन विषयी सांगितले होते कि, जरी प्रमोद महाजन बीजेपीमध्ये नसते तरीहि ते, भारतातील असंख्य सामान्य युवकांना प्रेरणास्थान राहिले असते. अशा लोकनेत्यास त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या स्मृतीस भारतीय जनता पार्टी तर्फे विनम्र अभिवादन.

यावेळी आमदार लक्ष्मण जगताप, सभागृह नेते एकनाथ पवार, शहर प्रवक्ते अमोल थोरात, नगरसेवक शत्रुघ्न काटे, नामदेव ढाके. शितल शिंदे, प्रियांका बारसे, प्रमोद निसळ, चेतन घुले, राजू सावंत, प्रदिप बेंद्रे, नंदू भोगले, संजीवनी पांडे, सुरेश वाडकर, रामकृष्ण राणे इत्यादी मान्यवरांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

सोल स्पेस या ऑर्गेनिक फॅशन लेबल तर्फे रीटेल आऊटलेट पुण्यात सुरु

पुणे (प्रतिनिधी) : सोल स्पेसने भारतातील आपले पहिलेच रीटेल आऊटलेट पुण्यात सुरु केले आहे. सोल स्पेसच्या या आघाडीच्या स्टोअरचे उद्घाटन झाले. येत्या डिसेंबरअखेरपर्यंत हा ब्रँड मुंबई, बंगळुरु व हैद्रराबादमध्येही पदार्पण करणार आहे. सोलस्पेसचे मिंत्रा,जबाँग व ॲमेझॉन या पोर्टल्सवर भक्कम ईकॉमर्स अस्तित्व असून स्वतःचे डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू डॉट मायसोलस्पेस डॉट इन हे संकेतस्थळही आहे. या ब्रँडने देशभरात आर्थिक वर्ष २०१९-२० अखेरपर्यंत आणखी २० स्टोअर्स उघडण्याची योजना आखली आहे. कंपनीच्या मालकीच्या स्टोअर्सखेरीज फ्रँचायसी प्रारुपाद्वारेही देशपातळीवर विस्तार साधला जाणार आहे.सोल स्पेस या चैतन्यमय फॅशन संवेदनशील ब्रँडच्या कापडातील प्रत्येक धाग्यात एक कहाणी आहे.

सोल स्पेस हा पहिलाच ऑर्गेनिक व फेअरट्रेड प्रमाणित फॅशन ब्रँड आहे. तो पर्यावरण सुरक्षित आणि किफायती कपड्यांची निर्मिती करतो.पुरुष व स्त्रिया या दोघांसाठीही या ब्रँडने रुप खुलवणारा सुंदर वस्त्रांचा संग्रह इसेन्शियल्स, स्टुडिओ व थलेजर अशा तीन श्रेणींमध्ये सादर केला आहे. इसेन्शियल्स श्रेणीतील कपडे बाहेरुन दिसण्यास सुंदर व आतून वापरण्यास सुखावह (फिल गुड इनसाईड) आहेत. त्यात लाऊंज व इन्टिमेटवेअर प्रकारातील वैविध्यपूर्ण कपडे उपलब्ध आहेत. स्टुडिओ कलेक्शनमध्ये योगा व परफॉर्मन्स वेअर हे कपडे असून लवचिक राहा (बी फ्लेक्झिबल) हे तत्त्व आहे. आरामदायी, स्टायलिश व साधे तरीही फॅशनेबल असे कपडे पुरवण्याचे तत्त्वज्ञान बाळगून या ब्रँडने आधुनिक अभिनवता व आकर्षकतेचा संगम साधून हे कपडे सादर केले आहेत. कामानंतर व्यायाम करायचा असो किंवा व्यायामानंतर काम करायचे असो, हे कपडे अत्यंत सोईस्कर ठरतात. थलेजर या खास फॅशनच्या कपड्यांमागे जगाला पुढे न्या (मूव्ह द वर्ल्ड) ही संकल्पना आहे. येथे स्पोर्ट्सवेअरने एक स्टायलिश वळण घेतले असून त्यामुळे तुम्हाला दिवसभर आणि प्रत्येक दिवशी खेळकरपणा अनुभवता येईल. या ट्रेंडी कपड्यांखेरीज सोल स्पेसने महिलांसाठी हातमागावर विणलेले ड्रेस व मुलांच्या कपड्यांचाही संग्रह उपलब्ध करुन देण्याची योजना आखली आहे.

पिंजऱ्यात बिबट्या अखेर जेरबंद

शिरुर (प्रतिनिधी) : शिरुर तालुक्यातील निमोणे येथे वावरत असलेला बिबट्याला वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात यश आले आहे. या बिबट्याला जेरबंद केल्यामुळे येथील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

निमोणे येथील परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर होता. ग्रामस्थांना शेतात आणि रस्त्याने जाताना अनेकवेळा बिबट्याचे दर्शन झाले होते. या

परिसरातील अनेक शेळ्या आणि कुत्र्यांचा फडशा या बिबट्याने पाडला होता. बिबट्याच्या दहशतीमुळे येथील नागरिक भयभीत झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली होती.

शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार ढमढेरे यांनी या भागात विठ्ठल काळे यांच्या शेतात पिंजरा लावला होता. ३ दिवसांच्या हुलकावणीनंतर चौथ्या दिवशी हा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. त्यानंतर शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार ढमढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली एस. एल. गायकवाड, बी. एम. दहातोंडे, वनाथ गांधिले यांनी जेरबंद बिबट्या ताब्यात घेत त्याच्यावर उपचार करून त्याची रवानगी जुन्नर तालुक्यातील माणिकडोह येथे निवारा केंद्रात करण्यात आली.

सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया तर्फे मराठी चॅनलसाठी

अजय भालवणकर यांची व्यवसाय प्रमुख पदी नियुक्ती

पुणे (प्रतिनिधी) : सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया तर्फे आपल्या लवकरच सादर होणार्या मराठी जनरल एंटरटेन्मेंट चॅनलसाठी अजय भालवणकर यांची व्यवसायप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अजय भालवणकर यांना मिडिया आणि एंटरटेन्मेंट उद्योगात २ दशकांहून अधिक असा प्रदीर्घ अनुभव आहे.याआधी ते सोनी एंटरटेन्मेंट टेलिव्हिजनमध्ये चीफ क्रिएटीव्ह डायरेक्टर म्हणून कार्यरत होते.

एनटीपीसी तर्फे दोन दिवसीय परिषद

पुणे (प्रतिनिधी) : एनटीपीसी तर्फे ॲग्रो रेसिडिव्ह ॲन्ड म्युनिसिपल सॉलिड वेस्ट टू पॉवर - चॅलेंजेस ॲन्ड वे अहेड टू इंडिया या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन केले होते.

याच्या उद्घाटनप्रसंगी उर्जा व अक्षयउर्जा राज्यमंत्री आर. के.सिंग, उजा सचिव ए.के.भल्ला, एनटीपीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गुरदीप सिंग उपस्थित होते.

दर्जेदार प्रकल्पांच्या अमलबजावणीचे रेराचे आश्वासन

गृह खरेदीदारांचा आर्थिक ताण आणि मानसिक त्रासापासून बचाव

पुणे (प्रतिनिधी) : केंद्र सरकारने रेरा म्हणजे रियल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) ॲक्ट २०१६ २६ मार्च २०१६ रोजी सादर केला. १ मे २०१७ पासून या कायद्याची अमलबजावणी करण्यात आली. गृह खरेदीदारांना परवडणा-या दराचा फायदा व्हावा हा या अमलबजावणी मागील उद्देश होता.

एआरटी अफोर्डेबल हाऊसिंग फायनान्सचे एमडी आणि सीईओ श्री. अरविंद हाली म्हणाले की, रेराचे रियल इस्टेट क्षेत्राला देखील अनेक दीर्घकालीन फायदे होते. शिवाय गृह खरेदी इच्छुकांकरिता हा कायदा लाभदायक होता. त्यामुळे दर कमी झाले, घरांचा ताबा मिळायला होणारी दिरंगाई आटोक्यात आली, तसेच गृह खरेदी करणा-यांना आपला मेहनतीचा पैसा कसा वाढेल याची स्पष्ट कल्पना आली. गृह खरेदीदारांना होणाऱ्या रेराच्या फायद्याची यादी पुढीलप्रमाणे:

घराचा ताबा मिळण्यात उशीर झाल्याने गृह खरेदीदारांना आर्थिक भुर्दंड बसण्याची चिंता नको

मागील दशकभरात घर खरेदीसाठी इच्छुक असलेल्यांना घराचा ताबा मिळण्यात दिरंगाई सहन करावी लागली. काही प्रकरणांमध्ये तर हा उशीर टोकाचा ठरला. त्यामुळे गृह खरेदीदारांना मानसिक त्रास आणि आर्थिक ताणाचा सामना करावा लागला.

वाढत्या महागाईविरोधात माहिती अधिकार मंचतर्फे जाहीर निषेध

वडगाव मावळ : वाढती महागाई, गुन्हेगारी तसेच महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या विरोधात शासनाचा जाहीर निषेध करण्यासाठी माहिती अधिकार मंच महाराष्ट्र राज्य संस्थापक नगरसेवक अरुण माने व किरण साळवे यांनी मावळ पंचायत समिती चौकात मंगळवार (दि. ८) रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले. शासनाचा जाहीर निषेध करुन निवेदन तहसीलदार रणजित देसाई यांना दिले.

भारतीय जनता पक्षाने सत्तेत येण्यासाठी जनतेला अच्छे दिन व खोटी आश्वासने दिली. सत्तेवर आल्यावर दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेल व गॅस दरवाढ करुन सर्वसामान्य जनतेचे जगणे महाग केले. जीवनावश्यक वस्तूंच्या किमंतीत वाढ केली. गुन्हेगारी वाढल्याने मुली व महिला सुरक्षित नसून, महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. नोटबंदी व जीएसटी सुरू करुन जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ केली. शासनाच्या योजना फसव्या असून, लाभार्थी फसवे आहेत. शेतकऱ्यांची कर्ज माफी बोगस आहे. वाढती महागाई कमी करण्यासाठी शासनाच्या विरोधात एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करून निषेध नोंदविला.

मावळ तालुक्यातील अनेक सामाजिक संघटना तसेच राजकीय पक्षांनी या उपोषणाला पाठिंबा दिला. या वेळी अरुण माने, किरण साळवे, अंकुश आंबेकर, किशोर कवडे व बहुसंख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

तहसील कार्यालयातील स्वच्छतागृहाची दुरवस्था

नागरिकांची गैरसोय : कचऱ्याच्या ढीग हटवण्याची मागणी

वडगाव मावळ : मावळ तहसील कार्यालयाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, तहसील कार्यालयाच्या परिसरात कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. स्वच्छतागृहाची दुरुस्ती तसेच परिसरातील कचऱ्याच्या ढीग त्वरित उचलण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मयूर ढोरे व नागरिकांनी केली.

मावळ तहसील कार्यालयात निवासी नायब तहसीलदार, महसूल शाखा, संजय गांधी निराधार शाखा, निवडणूक शाखा, अभिलेख कक्ष, नागरी सुविधा केंद्र आदी ठिकाणी विविध दाखले मिळविण्यासाठी नागरिकांची वर्दळ असते. तसेच महसूल भवन येथे दैनंदिन कार्यक्रम असल्याने सातत्याने नागरिकांची वर्दळ असते. नागरिकांसाठी उभारलेल्या स्वच्छतागृहाची दैनंदिन स्वच्छता होत नसल्याने स्वच्छतागृहात मोठ्या प्रमाणावर घाण जमा झाल्याने तीव्र दुर्गंधी येत आहे. महिला, पुरुष व अपंगांसाठी उभारलेले स्वच्छतागृह केवळ नावालाच असून, त्या स्वच्छतागृहांची दरवाजे तुटलेली आहेत. स्वच्छतागृहात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याने भिंतीला रंग चढला आहे.

दुरवस्था झालेल्या स्वच्छतागृहात नागरीक जात नाहीत. स्वच्छतागृहाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घूस व उंदरांनी उकिर आणल्याने परिसरात साप, विंचू व मुंग्यांचा वावर असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे देशात स्वच्छ भारत अभियान राबविले जात असताना शासकीय कार्यालयात उदासिनता दिसत आहे. कार्यालयाच्या परिसरात प्लास्टिक, कागद, झाडांचा पालापाचोळा, दारूच्या बाटल्यांचा ढीग साचला आहे. या कचऱ्याचा दुर्गंधीयुक्त वास येत आहे. यामुळे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या कार्यालयात अनेक वेळा विषारी नाग आढळून पकडले आहेत.

तहसील कार्यालयाच्या स्वच्छतागृहाची दुरवस्था तसेच कचऱ्याचे ढीग साचल्याने परिसराचे विद्रुपीकरण झाले आहे. सफाई कर्मचारी नेमले असून, कार्यालयाचा परिसर सतत कचरा दिसतो. तहसील कार्यालयाच्या स्वच्छतागृहाची त्वरित दुरुस्ती करून कचऱ्याचे ढीग उचलून परिसर स्वच्छ करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मयूर ढोरे, विशाल शिंदे, सिद्धेश ढोरे, महेश ढोरे, मकरंद ढोरे, युवराज ढोरे आदींनी केली.

पूना हॉटेलियर्स असोसिएशन आणि जेडब्ल्यू मॅरिएट पुणे तर्फे जागतिक थॅलिसिमिया दिनानिमित्त उपक्रम

पुणे (प्रतिनिधी) : पूना हॉटेलियर्स असोसिएशन (पीएचए) व जेडब्ल्यू मॅरिएट पुणे तर्फे आणि स्थानिक हॉटेल्स यांच्या सहयोगाने ८ मे रोजी होणार्या जागतिक थॅलिसिमिया दिनानिमित्त १७ एप्रिल ते ७ मे दरम्यान रक्तदान मोहीम आयोजित करण्यात आली होती. पूना हॉटेलियर्स असोसिएशनचे मुख्य कामकाज अधिकारी निरव पंचामिया यांनी या कार्यक्रमाची धुरा सांभाळली. यामुळेच पूना हॉटेलियर्स असोसिएशन ३०० युनिटस इतके रक्त जन कल्याण रक्त पेढीसाठी संकलित करू शकले. या महान कार्याचा भाग बनल्याचा जेडब्ल्यू मॅरिएटला अभिमान आहे कारण या मोहीमेमुळे थॅलिसिमिया हा अनुवांशिक रक्त विकार असणार्या अनेक रुग्णांचे जीव वाचण्यास मदत होऊ शकते. ही रक्तदान मोहिम पुण्यातील ८ हॉटेल्समध्ये आयोजित करण्यात आली होती.यामध्ये पुण्यातील ६० हून अधिक हॉटेल्समधून ५९७ वॉलेंटियर्सने सहभाग नोंदविला.या रक्तदान उपक्रमाला ३९७ दाते लाभले.

जेडब्ल्यू मॅरिएट पुणेचे सरव्यवस्थापक आणि पूना हॉटेलियर्स असोसिएशनच्या कार्यकारी समितीचे सदस्य विनीत मिश्रा म्हणाले, पीएचएच्यावतीने मी या मोहिमेतील प्रत्येक सहभागीं आणि दात्यांचे आभार मानतो ज्यांमुळे ही मोहीम यशस्वी होऊ शकली आहे. थॅलिसिमिया हि एक भयावह अवस्था असते आणि आम्ही शक्य तितक्या जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करून या उपक्रमाला सहकार्य करावे म्हणून प्रोत्साहन देत आहोत. हा विषय माझ्या मनाच्या खूप जवळचा आहे आणि या संपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून आम्हांला जे सहकार्य मिळाले त्याची मी प्रशंसा करतो. जेडब्ल्यू मॅरिएट पुणे येथे आम्ही निरंतर जीवन समृद्ध करण्यावर भर दिला आहे आणि गरजू व्यक्तींना मदत करत एक उदाहरण स्थापित केले आहे. थॅलिसिमिया हा एक दुर्दैवी अनुवांशिक आजार आहे आणि आम्हांला आनंद आहे कि आम्ही कोणाचे तरी आयुष्य सुकर करण्यास हातभार लावू शकलो.